पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २३५**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - ०२/०८/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ०२/०८/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
५) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६) मा.काळे विमल रमेश
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
८) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
९) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
१०) मा.अॅड.संदीप गुलाब चिंचवडे
११) मा.नेटके सुमन राजेंद्र
१२) मा.वाबळे संजय मल्हारराव
१३) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.दुधेकर, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.पठाण-उप शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा लोणकर - सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.शेख, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय

अधिकारी, मा.माने-विभागीय अधिकारी-पीएमपीएमएल, मा.बोदडे- प्रशासन अधिकारी, मा.मुंढे-सहा.प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र. २३) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ प्रभाग (मुख्यालयातील) कामांच्या तरतूदींमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र. २४) तरतुद वर्ग करणे व काम थेट पध्दतीने देणेबाबत– मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२५) फायरमन या पदावर मानधनावर नियुक्ती देणेबाबत– मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२६) प्रभाग क्र.९ शाहुनगर येथील कामाचे खर्चास मान्यता देणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२७) तरतुदी वर्ग करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतूदींमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) कासारवाडी मलशुध्दीकरण केंदांतर्गत, संत तुकाराम नगर प्रभाग क्र. ३९ मधील अक्षय सोसा. ययाती सोसा. तसेच उर्वरीत ठिकाणी जलनि:सारण व्यवस्था सुधारणा विषयक कामे करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) उद्यान सेवाशुल्क तत्वावर देखभाल चालन व संरक्षण कामी देणेबाबत – मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३१) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३२) प्रभाग क्र. २० चिंचवडेनगर मध्ये बिजलीनगर अंडरपास करणे या कामास सल्लागार नेमणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) तरतुद वर्ग करणे व काम थेट पध्दतीने देणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) वॉर्ड क्र.८१ काळेवाडी मधील आरक्षण क्र.६४० मध्ये प्राथमिक शाळा इमारत बांधणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) तरतुद वर्ग करणे व काम थेट पध्दतीने देणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) तरतुद वर्ग करणे व काम थेट पध्दतीने देणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३८) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ प्रभाग (मुख्यालयातील) कामांच्या तरतूदींमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील कामाच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) मुदतवाढ देणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये वाढ/घट करणेबाबत- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४२) आर्कटाईप असोसिएटस, आर्किटेक्ट नफिसा काझी, निगडी यांची मनपा पॅनेलवर आर्किटेक्ट म्हणुन नेमणुक करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) जाहिरातीचे हक्क ५ वर्षे कालावधीसाठी देणेबाबत – मा.संदिप चिंचवड, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) जाहिरातीचे हक्क ५ वर्षे कालावधीसाठी देणेबाबत – मा.संदिप चिंचवड, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) पिंपरी कॅम्पमधील सिंधी समाजाच्या छठ पुजेनिमित्त नदी पुजनासाठी सुभाष घाटावर फ्लोटींग फ्लॅटफॉर्म तयार करणेबाबत-मा.सुमन नेटके,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) पिं.चि.मनपाच्या सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकातील विद्युत मुख्य कार्यालयाचे एलईडी फीटींग खरेदी करणे व प्रशासकीय इमारत योजना या लेखाशिर्षाअंतर्गत तरतुद वर्ग करणेबाबत.

विषय क्र.४७) काम थेट पद्धतीने देणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४८) मनपाच्या जागांची भाडे आकारणी व वसुली करणेबाबत-मा.सुमन नेटके,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४९) ठराव दुरूस्तीबाबत- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५०) वाढीव खर्चास मंजूरी मिळणेबाबत - मा.अमिना पानसरे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५१) तरतुद वर्ग करणेबाबत- मा.संदिप चिंचवडे, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव.

---------

ठराव क्रमांक – १६८२२ विषय क्रमांक – १
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/३९६/२०१६ दि.२२/०७/२०१६
विषय:-मा.पदाधिकारी यांना आवश्यक निमंत्रण पत्रिका, लेटरहेड व पाकीटे छपाई साहित्य खरेदीबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८२३ विषय क्रमांक – २
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/३९५/२०१६ दि.२१/०७/२०१६

मा.सह आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –
मनपाचे नगररचना व विकास विभागासाठी आवश्यक मागणीनुसार मे. आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडुन कोटेशन नोटीस क्र.११/२०१६-१७ चे प्राप्त लघुत्तम दरानुसार ५०० नग हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्र (डी.आर.सी.प्रमाणपत्र) मनपा नमुन्याप्रमाणे छपाई कामी प्रती नग र.रु.३७.८० प्रमाणे येणारा एकुण खर्च र.रु.१८,९००/- (अक्षरी र.रू.अठरा हजार नऊशे फक्त) चे खर्चास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा पदाधिकारी यांचेसाठी लेटरहेड व विविध विभागासाठी ई-निविदा सूचना क्र.४१/२०१४-१५ अन्वये प्राप्त लघुत्तम मंजूर निविदा दराने मे.अमृत मुद्रणालाय, चिंचवड यांचे निमंत्रण पत्रिकेचे बील र.रु. ८,८१,५००/- अदा करण्यास व मार्च २०१७ पर्यंत निविदेतील प्राप्त लघुत्तम दराने मे.अमृत मुद्रणालय यांचेकडून छपाई करुन घेण्यास व त्याकामी र.रु. ११,००,०००/- पर्यंत येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२४ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- नागरवस्ती विकास योजना
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.सहाय्यक आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०४/कावि/३०६/२०१६ दि.२५/०७/२०१६

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना विभागाअंर्तगत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. महापालिकेच्या नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.६ अन्वये मनपा हद्दीतील अपंग व्यक्तिंना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणेबाबत सन २०१५-१६ मध्ये जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविले असुन प्राप्त अर्जापैकी प्रस्तावात नमुद प्रमाणे तीन लाभार्थिचे कर्ज प्रकरण बँकेने मंजुर

केले असून प्रस्तावात नमुद लाभार्थी यांच्या नावापुढे दर्शविलेनुसार प्रत्येकी र.रू.१,००,०००/- प्रमाणे एकूण र.रू.३,००,०००/- (अक्षरी र.रू. तीन लाख फक्त) चे अर्थसहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२५ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- नागरवस्ती विकास योजना
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नाावियो/१/कावि/६२९/२०१६ दि.१९/७/२०१६
विषय:-नागरवस्ती विकास योजना विभागाकडील विविध कल्याणकारी योजनांच्या, अर्जांची डेटा एंन्ट्री व ECS नोंदी महानगरपालिकेच्या संगणक प्रणालिमध्ये करणेबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२६ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षए/नि/कावि/३८९/२०१६ दि.२३/७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.**5/7/**2015-2016 मधील अ.क्र.1 अन्वये 26900 प्रभाग क्र.३ चिखली, ४ कृष्णानगर येथील अनाधिकृत बांधकामावर कार्यवाहीसाठी यंत्र सामुग्री पुरविणेकामी मे.सुयोगराज कंस्ट्रक्शन नि**.**र.रु.9,24,330/- (अक्षरी र.रु.नऊ लाख चोवीस हजार तिनशे तीस) पेक्षा 41.99% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२७ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षे/नि/कावि/३९१/२०१६ दि.२३/७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र**.**5/9/2015-2016 मधील अ.क्र.1 अन्वये 26899 प्रभाग क्र.१ रूपीनगर तळवडे, २ त्रिवेणीनगर येथील अनाधिकृत बांधकामावर कार्यवाहीसाठी यंत्र सामुग्री पुरविणेकामी मे. सुयोगराज कंस्ट्रक्शन नि.र.रु.9,24,269/- (अक्षरी र.रु.नऊ लाख

चोवीस हजार दोनशे एकोनसत्तर) पेक्षा 41.99% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२८ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/६/कावि/१८८/२०१६ दि.१९/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

The Institution of Engineers (India), Pune Local Centre यांनी दिनांक ५ व ६ ऑगस्ट २०१६ रोजी Environmental Engineers च्या ३२ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन यशदा, पुणे येथे केले आहे. सदर परिषदेमध्ये वाढत्या शहरीकरणा मुळे पर्यावरण व्यवस्थापनात येणारी आव्हाने या विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे. सदरच्या चर्चासत्रास मोठ्या संख्येने उपस्थित राहणेबाबत मा.संचालक, नगररचना व सहसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सुचना असून या परिषदेसाठी पिंपरी चिंचवड मनपाने प्रायोजकतेचे Gold Package घेणे बाबत मा.आयुक्त सो. पिंपरी चिंचवड मनपा यांचे सुचना आहेत, त्यानुसार सदरचे प्रायोजकतेचे Gold Package नुसार पिंपरी चिंचवड मनपाचे ५ अभियंता विनामुल्य परिषदेसाठी उपस्थित राहू शकतील. तसेच परिषदेच्या बोर्डवर पिंपरी चिंचवड मनपाचे बोधचिन्ह (Logo) प्रसिध्द करणेत येणार आहे. प्रायोजकतेच्या या Gold Package साठी येणारा खर्च र.रु. २,५०,०००/- असून सदरचा खर्च पर्यावरण विभागाकडील पर्यावरण या लेखाशिर्षातून खर्ची टाकणे शक्य आहे. सबब सदर परिषदेचे प्रायोजकतेचे Gold Package घेऊन परिषदेसाठी मनपाचे पर्यावरण विभागाकडील २, जलनिसारण विभागाचे २ व पाणीपुरवठा विभागाचे १ असे एकुण ५ अभियंते दिनांक ५ व ६ ऑगस्ट २०१६ रोजी यशदा, पुणे येथे उपस्थित राहणेस व त्यासाठी येणारा खर्च र.रु.२,५०,०००/-(अक्षरी र.रू. दोन लाख पन्नास हजार फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च पर्यावरण विभागाकडील लेखाशिर्ष पर्यावरण यामधील शिल्लक तरतुद रक्कम रुपये ५०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२९ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- स्थापत्य
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/९९/२०१६ दि.१४/०७/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.०३/०६/२०१६-१७ मधील काम क्र. ६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभागात वृक्षारोपनासाठी खड्डे खोदणे व पोयटा

माती भरणेकामी मे. कुबेरा एंटरप्रायजेस नि.र.रु.१५,४६,७६९/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख शेहचाळीस हजार सातशे एकोणसत्तर फक्त) पेक्षा ३०.३०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.११,३२,००३/-पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३० | विषय क्रमांक – ९

दिनांक – ०२/०८/२०१६ | विभाग- स्थापत्य

सुचक – मा.संदीप चिंचवडे | अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/९८/२०१६ दि.१४/०७/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे – मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.०३/०६/२०१६-१७ मधील काम क्र.५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभागात वृक्षारोपनासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे कामी मे. डी डी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३७,५९९/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख सदोतीस हजार पाचशे नव्याण्णव फक्त) पेक्षा ३१.९९% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१६,६९,२९१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३१ | विषय क्रमांक – १०

दिनांक – ०२/०८/२०१६ | विभाग- वायसीएमएच

सुचक – मा.संदीप चिंचवडे | अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी/१/कावि/१०४५/२०१६ दि.२५/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामधील खाली नमुद केले प्रमाणे मानधनावरील कर्मचा-यांची मानधन वाढीस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | अनुभव | सद्या देण्यात येणारे मानधन | किमान वेतन दर | द्यावयाची मानधन वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | एकत्रीत मानधन | १०,०००/- | ११,४३९/- | ११,४५०/- |
| २ | स्त्री व पुरुष कक्ष मदतनिस | ० ते ३वर्ष | ७,०००/- | ११,२४१/- | ११,२५०/- |
| | | ३ ते ५ वर्ष | ८,५००/- | - | १२,२५०/- |
| | | ५ वर्षापेक्षाजास्त | १०,०००/- | - | १३,२५०/- |
| ३ | एक्स रे टेक्निशियन | ० ते ३वर्ष | १०,०००/- | १२,२४१/- | १२,२५०/- |
| | | ३ ते ५ वर्ष | १२,०००/- | - | १४,२५०/- |
| | | ५ वर्षापेक्षाजास्त | १४,०००/- | - | १६,२५०/- |
| ४ | ई.सी.जी. टेक्निशियन | ० ते ३वर्ष | १०,०००/- | ११,३८८/- | ११,४००/- |
| | | ३ ते ५ वर्ष | १२,०००/- | - | १३,४००/- |
| | | ५ वर्षापेक्षाजास्त | १४,०००/- | - | १५,४००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३२ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/१२८/२०१६ दि.२५/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष, दिनांक १४ एप्रिल २०१५ ते १४ एप्रिल २०१६ हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यास सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत शासन निर्णय क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/बांधकामे, दि. ०९/१०/२०१५ प्राप्त झाले आहेत. तसेच जयंती वर्षानिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम राबविणेकामी सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. २९/०७/२०१६ रोजी आचार्य अत्रे रंगमंदीर, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-१८ येथे करण्यात आले आहे. याकामी विजेत्यांची बक्षीस रक्कम, प्रमाणपत्रे व त्यावरील लिखान, लॅमिनेशन, परिक्षकांचे मानधन, फ्लेक्स बॅनर छपाई व फ्रेम रेन्ट, मान्यवर/स्पर्धक/कलाकार चहापान, भोजन व्यवस्था, कलाकारांचे मानधन, निवास, रंगमंदीर भाडे, संविधान पुस्तके इ. करीता थेट पध्दतीने खर्च र.रु. २,४०,५००/- (अक्षरी र.रु. दोन लाख चाळीस हजार पाचशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३३ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२४७/१६ दि.२७/७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.6/5-2015-16 मधील अ.क्र.1 अन्वये प्रभाग क्र.६ डुडुळगाव येथील टाकीद्वारे पाणीपुरवठा होणा-या भागात देखभाल व दुरूस्ती विषयक कामे करणेकामी मे.एम.जे.कंन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रू.5,04,090/- (अक्षरी र.रु. पाच लाख चार हजार नव्वद फक्त) पेक्षा 26.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३४ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२४६/१६ दि.२७/७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.6/5-2015-16 मधील अ.क्र.2 अन्वये प्रभाग क्र.36 मधील लांडेवाडी परिसरात पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरूस्ती करणे कामी मे. एम.जे.कंन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रू. 5,04,090/- (अक्षरी र.रु. पाच लाख चार हजार नव्वद फक्त) पेक्षा 26.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३५ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/४६१/१६ दि.२६/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील निनो.क्र.२७/१२/१६-१७ अन्वये पिंपरी वाघेरे प्रभाग क्र. ४५ मधील शिवाजी महाराज व कै.भिकु वाघेरे(पाटिल) यांच्या पुतळयाजवळील परिसराचे सुशोभिकरण करणेकामी मे.शुभम उदयोग नि.र.रु.४६,६८,५३४/- (अक्षरी र.रु.सेहचाळीस लाख अडुसष्ठ हजार पाचशे चौतीस फक्त) पेक्षा २.३०% जास्त् या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ४७,७५,९१०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये

झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३६ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/४३७/२०१६ दि.२८/०७/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी करीता अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा जुलै 2016 च्या दुस-या सत्रासाठी बिल ऑफ मटेरियल साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र. 10/2016-17 अन्वये, ऑनलाईन कोटेशन दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम पुरवठाधारक मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचे 154 बाबींचे दर र.रु.91711=50 व मे पी.शेषाद्री अँण्ड कंपनी यांचे एकूण 144 बाबींचे दर र.रु. 88,742=50 असे एकूण 170 बाबींचे दर र.रु. 1,80,454/- (अक्षरी र.रू. एक लाख ऐंशी हजार चारशे चौपन्न फक्त) चे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स व मे. पी शेषाद्री अँण्ड कंपनी यांचेकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३७ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/४३६/२०१६ दि.२७/०७/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कासारवाडी करीता अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा जुलै 2016 च्या दुस-या सत्रासाठी बिल ऑफ मटेरियल साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.09/2016-17 अन्वये ऑनलाईन कोटेशन दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम पुरवठाधारक मे.पी.शेषाद्री अँण्ड कंपनी यांचे एकूण 36 बाबींचे दर र.रु.44,623/-(अक्षरी र.रू चौवेचाळीस हजार सहाशे तेवीस फक्त) चे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत मे. पी शेषाद्री अण्ड कंपनी यांचेकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३८ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातवि/१३/कावि/२००/२०१६ दि.२८/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

Primary Data Centre करीता म.न.पा.चे १६ नग (Dell Make Server) तीन नग सर्व्हर 42 U Rack मध्ये Host करणे बाबतचा वार्षिक र.रू.18,00,000/- अधिक कर व Bandwidth 12 Mbps (1:1) Rs.4,32,000/- वार्षिक व 64 नग IP Address र.रू.६४,०००/- प्रति वर्ष असा एकूण र.रू.२२,९६,०००/- (अक्षरी र.रू. बावीस लाख शहान्नव हजार फक्त) + कर इतका खर्च अपेक्षित आहे. Software Technology Parks of India (STPI), हिंजवडी, पुणे या केंद्र शासनाचे संस्थेच्या Primary Data Centre मध्ये Server Host करणेकामी १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ करणेस होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व निविदा प्रसिद्ध न करता थेट पद्धतीने STPI यांचे बरोबर दि.०४/०१/२०१७ पासून १ वर्षे कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८३९ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.नितीन लांडगे, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव-

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दिनांक २५/०७/२०१६ ठराव क्रमांक ६९ अन्वये भोसरी हे या शहरातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले आणि कला, संस्कृती, क्रीडा परंपरा जपणारे गांव आहे. प्रतिवर्षी गणेशोत्सवाचे काळामध्ये भोसरी कला क्रीडा मंचाच्यावतीने भोसरी कला व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये नाटय, काव्य, लोक परंपरा, इ. कार्यक्रम घेण्यात येतात. त्यासाठी कोणत्याही नागरिकाकडून कोणतेही शुल्क घेण्यात येत नाही. हा महोत्सव नागरिकांची सांस्कृतिक भूक भागविणारा असून शहराच्या वैभवात भर घालणारा आहे. या वर्षी पासून महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सहकार्याने व भोसरी कला, क्रीडा मंचाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यास आणि त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८४० विषय क्रमांक – १९

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.संगीता पवार, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दिनांक २५/०७/२०१६ ठराव क्रमांक ७० अन्वये प्रभाग क्र.११ येथील मधुकर पवळे व्यायामशाळा, राजनगर ही व्यायाम शाळा जय भवानी मित्र मंडळ, यमुनानगर या संस्थेस दरमहा सेवा शुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देऊन ११ महिने कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८४१ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.संगीता पवार, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दिनांक २५/०७/२०१६ ठराव क्रमांक ७१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व पुणे जिल्हा रोलबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोसिएशन तसेच प्रबोधनकार विकास क्रीडा संस्था, यमुनानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माहे ऑगस्ट/सप्टेंबर २०१६ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटिंग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक जिल्हास्तर रोलबॉल स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या र.रु.३,४८,५४४/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता, तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.३,४८,५४४/- मधील स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च एकूण र.रु.६०,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.२,४८,५४४/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८४२ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:- मा.अरूण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा दिनांक २५/०७/२०१६ ठराव क्रमांक ७२ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडे नियमित भरती बंद असल्यामुळे

व क्रीडा विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे क्रीडा विभागाकडून वर्षभर कबड्डी, खो-खो, फुटबॉल, व्हॉलीबॉल अशा विविध महापौर चषक स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेसाठी ग्राऊंड आखणेसाठी मनुष्यबळ नसल्यामुळे बाहेरुन काम करुन घ्यावे लागते. त्यामुळे या कामातील तज्ञ व अनुभवी श्री.सैफन रजाक शेख यांची सहा महिने कालावधीसाठी दरमहा र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रू. दहा हजार फक्त) मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८४३ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.विकास अभियंता(वि/यां) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/५३/२०१६ दि.२५/७/२०१६

मा.विकास अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.18/2015-2016 मधील अ.क्र.14 अन्वये भोसरी रुग्णालयातील व भोसरी स्मशान भूमीतील जनित्रांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.अवधूत इलेक्ट्रीकल्स लाईफ अँन्ड सर्व्हिसेस नि.र.रू.1,82,521/-(अक्षरी र.रू.एक लाख ब्याऐंशी हजार पाचशे एकवीस फक्त) पेक्षा 27.27% कमी या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक – १६८४४ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयाचे सन २०१६-१७ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१,२७,८०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८४५ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व प्रभागांतील पावसामुळे पडलेले खड्डे व चर भरण्याचे काम त्वरीत हाती घेणे आवश्यक असुन, पावसाळ्याच्या काळात प्रचलीत पद्धतीने डांबरीकरणाचे काम करता येत नाही, त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सदरचे खड्डे व चर ओलसर परिस्थितीत देखील पॉलीमराईज्ड कोल्ड डांबर मिश्रित मटेरियलने भरणे शक्य आहे. सदर कामाची तातडी व निकड पाहता मे.ओम एस.एस.एस. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेस सदरचे काम निविदा न मागविता थेट पद्धतीने देणेस व त्याकामी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पा.क्र.६५ अ.क्र.५९ वरील कामावर र.रु. ५,००,०००/-, पा.क्र.३११ अ.क्र.१३५ या कामाच्या तरतुद र.रु.१,५०,००,०००/- मधुन वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचे पा.क्र. ६५ अ.क्र.५९ वरील कामातुन फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागांतील खड्डे व चर वरील तंज्ञत्रानाचा वापर करुन मे.ओम एस.एस.एस. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेमार्फत भरणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८४६ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहराची झपाट्याने वाढ होत आहे. त्यादृष्टीने अग्निशामक व आपत्ती व्यवस्थापनाचे काम महत्वाचे आहे. महापालिकेच्या अग्निशामक विभागाकडे उपलब्ध फायरमन कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्याने त्याठिकाणी फायरमन कर्मचा-यांची आवश्यकता आहे. ही बाब विचारात घेता श्री.प्रशांत नवनाथ पवार, राहणार शाहुनगर, चिंचवड यांनी Fire Engineering & Safety Management हा १ वर्षाचा पाठ्यक्रम पुर्ण केलेला असल्याने त्यांना अग्निशामक विभागाकडील फायरमन या पदावर पुढील ६ महिने कालावधीकरिता दरमहा र.रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८४७ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

शाहूनगर (प्र.क्र.९) येथील एचडीएफसी कॉलनीतील २० वर्षांपूर्वी उभे केलेले खांब गंजले / सडल्यामुळे धोकादायक झाले आहेत. त्यापासून तेथील नागरिकांना धोका आहे. सध्या चालू असलेल्या कामांमध्ये खांब उभारताना निघणा-या जुन्या खांबांपैकी सुस्थितीत निघणारे खांब एचडीएफसी कॉलनीमध्ये उभे करुन देण्यास व त्याकरिताचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८४८ विषय क्रमांक – २७

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(वाढ/घट– ४,५०,०००/-)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६८४९ विषय क्रमांक – २८

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

फ क्षेत्रिय कार्यालयातील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(वाढ/घट– ७०,००,०००/-)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्रमांक –१६८५० विषय क्रमांक – २९

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कासारवाडी मलशुद्दीकरण केंदांतर्गत, संत तुकाराम नगर प्रभाग क्र. ३९ मधील अक्षय सोसा., ययाती सोसा. तसेच उर्वरीत ठिकाणी जलनि:सारण

व्यवस्था सुधारणा विषयक कामे करणे. निविदा र.रु. २२,४९,९१२/- निविदा क्रमांक १/३७/२०१५-१६ चे काम ठेकेदार मे.श्री.कॉन्टक्टर हे मा. स्थायी समिती ठराव क्र. १६२५३, दि. १७/०५/२०१६ अन्वये २८.८८% कमी मंजुर दराने, भाववाढ फरकासह करीत आहेत. या कामाची व्याप्ती वाढत वाढत असलेने यापूर्वीचा खर्च मान्यता र.रु. १६,८०,१४४/- व वाढीव र.रु. १८,७५,८५६/- अशी एकूण ३५,५६,०००/- पर्यंतच्या सुधारित खर्चास याआधी मंजुर केलेल्या दरानेच म्हणजेच निविदा रकमेच्या २८.८८% कमी, भाववाढ फरकासह खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्रमांक – १६८५१ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

खराळ आई उद्यान व भानुदास ववले उद्यान ओम साई स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेस योग्य त्या अंशत: सेवा शुल्क तत्वावर एक वर्ष कालावधी करीता देखभाल चालन व संरक्षण देण्यात व त्या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजूरी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५२ विषय क्रमांक – ३१

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. **(वाढ/घट– ३,५०,०००/-)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५३ विषय क्रमांक – ३२

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

प्रभाग क्र. २० चिंचवडेनगर मध्ये बिजलीनगर अंडरपास करणे हे काम सन २०१६-१७ अंदाजपत्रकामध्ये विशेष योजना पान क्र. १४, अ.क्र. ३(७) वर आहे. सदर कामास यावर्षी अंदाजपत्रकामध्ये अंदाजपत्रकीय र.रु. २ कोटी व तरतुद र.रु. १६ लाख इतकी आहे. तरी सदर कामासाठी सल्लागार म्हणून मे. नील इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा.लि. या संस्थेची नेमणुक करणे आवश्यक वाटते. तरी प्रभाग क्र. २० चिंचवडेनगर मध्ये बिजलीनगर

अंडरपास करणे या कामास सल्लागार मे. नील इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा.लि. यांना देण्यात येणारे देयक हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार म्हणजेच २.३५% (निविदापुर्व कामकाज १% व निविदा पश्चात कामकाज १.३५%) देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५४ विषय क्रमांक – ३३

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व प्रभागातील पावसामुळे पडलेले खड्डे व चर भरण्याचे काम त्वरीत हाती घेणे आवश्यक असुन, पावसाळ्याच्या काळात प्रचलीत पध्दतीने डांबरीकरणाचे काम करता येत नाही, त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सदरचे खड्डे व चर ओलसर परिस्थितीत देखील पॉलीमराईज्ड कोल्ड डांबर मिश्रित मटेरियलने भरणे शक्य आहे. सदर कामाची तातडी व निकड पाहता मे.ओम एस.एस.एस.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ,पुणे या संस्थेस सदरचे काम निविदा न मागविता थेट पध्दतीने देणेस व त्याकामी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पा.क्र.९४ अ.क्र. १२१ वरील कामावर र.रु. ३,००,०००/- पा.क्र. ९९ अ.क्र. इ-१ या कामाच्या तरतुद र.रु. ८,३०,००,०००/- मधुन वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचे पा.क्र. ९४ अ.क्र. १२१ वरील कामातुन अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील खड्डे व चर वरील तंत्रज्ञानाचा वापर करुन मे.ओम एस.एस.एस.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेमार्फत भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५५ विषय क्रमांक – ३४

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. **(वाढ/घट– ४,००,०००/-)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५६ विषय क्रमांक – ३५

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:- मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

वॉर्ड क्र.८१ काळेवाडी मधील आरक्षण क्र.६४० मध्ये प्राथमिक शाळा इमारत बांधणे, निविदा र.रु.२,३१,९५,२०३/- निविदा क्र.१/१-२०१३/१४ चे काम ठेकेदार मे.देव कन्सट्रक्शन हे मा.स्थायी समिती ठराव क्र.३८०३, दि.३१/०७/२०१३, २०.०९% जास्त मंजुर दराने भाववाढ फरकासह करीत आहेत. या कामाची व्याप्ती वाढत असलेने यापुर्वीच्या खर्च मान्यता र.रु. २,७८,५५,११९/- व वाढीव र.रु.४७,८९,२६६/- अशी एकूण र.रु.३,२६,४४,३८५/- पर्यंतच्या सुधारित खर्चास याआधी मंजुर केलेल्या दरानेच म्हणजेच निविदा रक्कमेच्या २०.०९% जास्त, भाववाढ फरकासह खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५७ विषय क्रमांक – ३६

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व प्रभागातील पावसामुळे पडलेले खड्डे व चर भरण्याचे काम त्वरीत हाती घेणे आवश्यक असुन, पावसाळ्याच्या काळात प्रचलीत पध्दतीने डांबरीकरणाचे काम करता येत नाही, त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सदरचे खड्डे व चर ओलसर परिस्थितीत देखील पॉलीमराईज्ड कोल्ड डांबर मिश्रित मटेरियलने भरणे शक्य आहे. सदर कामाची तातडी व निकड पाहता मे.ओम एस.एस.एस.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेस सदरचे काम निविदा न मागविता थेट पध्दतीने देणेस व त्याकामी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पा.क्र.१६१ अ.क्र. १३७ वरील कामावर र.रु. ३,००,०००/- पा.क्र. १६९ अ.क्र. १ या कामाच्या तरतुद र.रु. ८,४०,००,०००/- मधुन वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचे पा.क्र. १६१ अ.क्र. १३७ वरील कामातुन क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील खड्डे व चर वरील तंत्रज्ञानाचा वापर करुन मे.ओम एस.एस.एस.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेमार्फत भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५८ विषय क्रमांक – ३७

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व प्रभागातील पावसामुळे पडलेले खड्डे व चर भरण्याचे काम त्वरीत हाती घेणे आवश्यक असुन, पावसाळ्याच्या काळात प्रचलीत पध्दतीने डांबरीकरणाचे काम करता येत नाही, त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सदरचे खड्डे व चर ओलसर परिस्थितीत देखील पॉलीमराईज्ड कोल्ड डांबर मिश्रित मटेरियलने भरणे शक्य आहे. सदर कामाची तातडी व निकड पाहता मे.ओम एस.एस.एस.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेस सदरचे काम निविदा न मागविता थेट पध्दतीने देणेस व त्याकामी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पा.क्र.२१८ अ.क्र. १ या कामाच्या तरतुद र.रु.७,५०,००,०००/- मधुन वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचे पा.क्र. २१८ अ.क्र.१ वरील कामातुन ड क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील खड्डे व चर वरील तंत्रज्ञानाचा वापर करुन मे.ओम एस.एस.एस.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे या संस्थेमार्फत भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८५९ विषय क्रमांक – ३८

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग (मुख्यालयातील) सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. **(वाढ/घट– ३३,००,०००/-)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८६० विषय क्रमांक – ३९

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. **(वाढ/घट र.रू.३,५०,०००/-)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८६१ विषय क्रमांक – ४०

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक- मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.सविता साळुंके, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या इमारतीमधील डक्ट व डक्टमधील ड्रेनेज लाईन तसेच भुयारी गटर्सची साफसफाई, देखभाल व दुरुस्तीचे सर्व कामकाज मे.भारतीय महिला स्वयंरोजगार संस्था मर्यादित यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम ई-निविदा (कमी करुन दिलेले दरानुसार) प्रतिमहा र.रु.४३,७००/- प्रमाणे करण्यास व त्यांचे समवेत करारनामा करुन व अनामत घेवून सादर केलेल्या लघुत्तम निविदा दरानुसार तीन वर्षे कालावधीकरता कामाचा आदेश देण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३७२१, दिनांक २३/०७/२०१३ अन्वये मान्यता दिलेली होती. मा.स्थायी समिती ठरावास अधिन राहून मे.भारतीय महिला स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित यांचे समवेत दिनांक ०७/०८/२०१३ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दिनांक ०६/०८/२०१६ रोजी संपुष्टात येणार असल्याने पुढील तीन वर्षाकरीता त्यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून मुदतवाढ देणेकामी व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६८६२ विषय क्रमांक – ४१

दिनांक – २८/०६/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भः-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

क क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. ५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६८६३ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भः-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

आर्कटाईप असोसिएटस, आर्किटेक्ट नफिसा काझी, निगडी यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणेस व त्यांना आर्किटेक्ट विषयक व इंटिरियर डिझायनिंगची कामे देणेस व त्याकामी होणारी फि आर्किटेक्ट कौन्सिलच्या नियमानुसार अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे

इमारतीमध्ये उद्धवाहक (लिफ्ट) बसविणे व निगडी से.क्र. २४ अग्निशामक केंद्राशेजारील मोकळ्या जागेत दवाखाना / OPD इमारत बांधणे कामी मे.सचिन आपटे अँड असोसिएटस, चिंचवड यांची नेमणुक करणेत आलेली होती. तथापी त्यांनी सदर प्रस्तावांचा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडे (PCNTDA) पुरेसा पाठपुरावा न केलेने, सदरची कामे प्रलंबित आहेत. सदरची कामे पुर्ण करणेस मे. सचिन आपटे अँड असोसिएटस यांनी असमर्थता दर्शविलेली आहे. तरी नागरिकांच्या सोयीसाठी सदरची दोन्ही कामे करणे आवश्यक आहे. तरी वर नमुद केलेल्या उद्धवाहक ( लिफ्ट) बसविणे व दवाखाना/OPD इमारतीचे वास्तुविशारद म्हणुन मे.सचिन आपटे अँड असोसिएटस, चिंचवड यांचे ऐवजी आर्कटाईप असोसिएटस, निगडी आर्किटेक्ट नफिसा काझी एस.यांची नेमणुक देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८६४ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदिप चिंचवडे अनुमोदक-मा.नारायण बहिरवडे

संदर्भ:-मा.संदिप चिंचवडे, मा.नारायण बहिरवडे यांचा प्रस्ताव –

चिंचवड येथील वाल्हेकरवाडी-थेरगाव रोड या MDR-31 रस्त्यावरील व थेरगाव पुल चौकाचे सुशोभिकरण व देखभाल करण्यासाठी जाहिरातीचे हक्क ५ वर्ष कालावधीसाठी पवना अँडव्हरटायजिंग या जाहीरात संस्थेस देण्यास व करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८६५ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदिप चिंचवडे अनुमोदक-मा.नारायण बहिरवडे

संदर्भ:-मा.संदिप चिंचवडे, मा.नारायण बहिरवडे यांचा प्रस्ताव –

चिंचवड येथील क्रां.चापेकर बंधू उड्डाण पुलाखालील सर्व बेटे, परिसर व २४ पिलर याचे सुशोभिकरण व देखभाल करण्यासाठी जाहिरातीचे हक्क ५ वर्ष कालावधीसाठी पवना अँडव्हरटायजिंग या जाहीरात संस्थेस देण्यास व करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८६६ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ०२/०८/२०१६
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी कॅम्प येथे सालाबादप्रमाणे सिंधी बांधवांचा छठ पुजा महोत्सव चालू असून सदर सणानिमित्त नदीची पुजा केली जाते. पिंपरीमधील पवना नदीवरील झुलेलाल मंदिराजवळील सुभाष घाटावर दरवर्षी मोठ्या प्रमाणात सिंधी बांधव एकत्र येऊन नदीची पुजा करतात. नुकतेच सुभाष घाटावरील पवना नदीचे पात्रातील सर्व गाळ व कचरा काढून नदीचे पात्र स्वच्छ केले आहे. सदरचे नदीपात्रात आत जाऊन पुजा करणेकरिता त्याठिकाणी फ्लोटींग डेक व जेटी बसविणे आवश्यक आहे. जेणेकरुन भाविकांना नदी पात्रातील पाण्याची पुजा करणे शक्य होईल त्यादृष्टीने असे काम करणा-या अनुभवी ठेकेदाराकडून यासाठी दर मागविले असता ३० स्क्वे. मी. फ्लोटींग डेकसाठी सर्व टॅक्ससहीत वाहतुक खर्च, जागेवर बसवून देणेसह एकुण खर्च र.रु.७,२५,०००/- इतका येत आहे. सद्यस्थितीत सण चालू असल्याने कामाची आवश्यकता व तातडी लक्षात घेता सदरचा फ्लोटींग डेक (जेट) गजराज बोटींग क्लब, देहूगांव यांचेकडून विनानिविदा थेट पद्धतीने करारनामा करुन घेणेस व त्यासाठी येणा-या एकत्रित र.रु.७,२५,०००/- च्या रकमेस मान्यता देऊन त्वरित खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८६७ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.संदिप चिंचवडे अनुमोदक-मा.अमिना पानसरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/मुका/२९५/१६ दि.२/८/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.म.न.पा.च्या सन-२०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकातील विद्युत मुख्य कार्यालयाचे एल ई डी फिटींग खरेदी करणे (भांडवली) व प्रशासकीय इमारत योजना (भांडवली) या लेखाशिर्षा अंतर्गत विविध कामांना काम पूर्ण करण्याकरिता तरतूद कमी पडत असल्याने प्रस्तावासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट अ व ब नुसार तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.(परिशिष्ट अ-वाढ/घट र.रु.२,०७,२७,०००/- परिशिष्ट ब-वाढ/घट र.रु.२,५१,२७,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८६८ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.६ मधिल पावसामुळे पडलेले खड्डे व चर भरण्याचे काम त्वरित हाती घेणे आवश्यक असून, पावसाळ्याच्या काळात प्रचलित पद्धतीने डांबरीकरणाचे काम करता येत नाही. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सदरचे खड्डे व चर ओलसर परिस्थितीत देखील पॉलीमराईजक कोल्ड मिक्स डांबर मिश्रित मटेरियलने भरणे शक्य आहे. सदर कामाची तातडी व निकड पाहता मे.ओम एस.एस.एस. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे या संस्थेस "प्रभाग क्र.६ मोशी येथील रस्त्यांची दुरुस्ती डांबरीकरणाने करणे." (पा.क्र.७१५/५५) या कामाची निविदा न मागविता परंतू करारनामा करुन र.रु.९,१०,०००/- (रु.नऊ लक्ष दहा हजार फक्त) पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८६९ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

मनपा कार्यक्षेत्रामध्ये मनपा ठेकेदारांना त्यांना त्यांच्या साईट ऑफिस, गोडाऊन, प्रयोगशाळा, लेबरकॅम्प सिमेंट मिक्सिंग प्लांट, डांबर प्लांट, वजनकाटा इ. साठी मनपाच्या जागा/भूखंड नगररचना विभागाने निश्चित केलेल्या मासिक भाडे दराने भूईभाडे तत्वानुसार व सदर भाडेदरात दुस-या वर्षापासून मनपा करेत्तर समिती शिफारस प्रमाणे करारनामा कालावधी पर्यंत दर वर्षी १२.५०% वाढ निश्चित करुन मनपा अटी शर्ती नुसार प्रत्यक्ष जागा वापरास दिल्याचे दिनांकापासून किंवा महिन्यापासून भाडे आकारणी व वसुल करण्यास व त्यासंबंधीचा करारनामा मनपा प्रकल्प पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.८४७८ दि.२३/०६/२००९ अन्वये यापूर्वीच मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार रावेत स.नं.९६ येथील सरकारी माळरान जमीन महानगरपालिकेकडे मा.जिल्हाधिकारी यांचेकडून सन १९९७ पासून देखभाल व दुरुस्तीसाठी वर्ग झालेली असून त्यातील चार एकर जमीन मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना साईट ऑफिस व ऑपरेशन प्लांटसाठी भाडे तत्वावर देण्यात आलेले असून उपरोक्त ठरावाच्या अधीन राहून वेळोवेळी नुतनीकरण करुन देण्यात आलेले आहे. मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची महानगपालिकेत विविध कामे चालू असून सदरची जागा भाडेकरार नूतनीकरण त्यांना पुढील पाच वर्षांसाठी वर उल्लेख केलेल्या सर्व जागेसाठीचा मागील

सन २०१५-१६ करीताच्या वार्षिक एकूण भाडे आकारणी दर रु.२,०५,९९४/- (अक्षरी र.रु.दोन लाख पाच हजार नऊशे चौ-याण्णव) या मागील दरामध्ये १२.५०% वाढ करून व मूळ ठरावात उल्लेख केल्याप्रमाणे दर वर्षी १२.५०% वाढ निश्चित करुन पुढील पाच वर्षांसाठी एकूण भू भाडे रक्कम रु.१४,८६,९२५/- (अक्षरी र.रु.चौदा लाख शहाऐंशी हजार नऊशे पंचवीस) याप्रमाणे देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८७० विषय क्रमांक – ४९

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जाहिरात रोटेशन धोरण सन २०१६-१७ चे दरास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१६५७१, दि.२८/०६/२०१६ अन्वये मान्यता दिली आहे. त्यामधील रोटेशन ड मधील अ.क्र.१३ येथे पुण्यनगरी या वृत्तपत्राचा राज्यस्तरीय दर र.रु. २३४/- ऐवजी र.रु.९००/- अशा दुरूस्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८७१ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:-मा.अमिना पानसरे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१९ मध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे (निविदा क्र.५/६७/२०१५-१६) या कामाचे निविदा दर वजा जाता सुधारीत खर्च र.रु. ३३,३६,२७०/- (वाढीव खर्च २०,६०,०००/-) यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामास प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.६,६०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८७२ विषय क्रमांक – ५१

दिनांक – ०२/०८/२०१६

सुचक – मा.संदिप चिंचवडे अनुमोदक-मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.संदिप चिंचवडे, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये विकास कामे करणे कामी प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/घट र.रू.२,४५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९९४/२०१६
दिनांक – ०३/०८/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.